# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक -ससं/उशि/निवडणूक/पुवि/२०२४ / 6285 दि. ०८/०७/२०२४

**अतितात्काळ / महत्वाचे - बीबीए/बीसीए/बीएमएस सीईटी**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,

३. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, बी.बी.ए., बी.सी.ए, आणि बी.एम.एस. **पुणे,अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. अभ्यासक्रम केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाविद्यालय नोंदणी करणेबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांचे पत्र क्र. बीबीए-३४२४/प्र.क्र.३८ (ई-६२६४८७)सीईटीसेल दि. ०८.०७.२०२४.

संचालनालयाचे संदर्भिय परिपत्रक कृपया अवलोकनी घ्यावे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.बी.ए., बी.सी.ए, आणि बी.एम.एस. हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित केले जाणार असल्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदरहू अभ्यासक्रमांसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

बी.बी.ए., बी.सी.ए, आणि बी.एम.एस. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (CET) आयोजित करुन सदरहू परीक्षेमध्ये (CET) प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. सदरहू गुणवत्ता क्रमानुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच, सदरहू अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे नियंत्रण हे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत करण्याबाबत शासनाद्वारे निर्णय घेण्यात आलेला असून त्याबाबत शासनपत्र दिनांक १२.०६.२०२४ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने बी.बी.ए., बी.सी.ए, आणि बी.एम.एस. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत मान्यता प्राप्त झालेल्या शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक / विद्यापीठ संचलित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक / कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असणारी महाविद्यालये / विद्यापीठ विभाग यांनी https://bbabcacap24.mahacet.org/ या संकेतस्थळावर दिनांक **०८.०७.२०२४ ते दिनांक १५.०७.२०२४** या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नांवनोंदणी करावी.

नावनोंदणीबाबतच्या सूचना संचालनालयाचे सोबतच्या परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे परिपत्रक.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६**

Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. बीबीए-३४२४/प्र.क्र. ३८(ई-६२६४८७)/सीईटीसेल/ दिनांक : ०८/०७/२०२४

**परिपत्रक -**

**विषय : बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. अभ्यासक्रम केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाविद्यालय नोंदणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी अवगत करण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.बी.ए., बी.सी.ए., आणि बी.एम.एस. हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत नियंत्रित केले जाणार असल्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदरहू अभ्यासक्रमांसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

बी.बी.ए., बी.सी.ए. आणि बी.एम.एस. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (CET) आयोजित करुन सदरहू परीक्षेमध्ये (CET) प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. सदरहू गुणवत्ता क्रमानुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच, सदरहू अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे नियंत्रण हे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत करण्याबाबत शासनाद्वारे निर्णय घेण्यात आलेला असून त्याबाबत शासनपत्र दिनांक १२.०६.२०२४ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) मार्फत मान्यता प्राप्त झालेल्या शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक/ विद्यापीठ संचलित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक/ कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असणारी महाविद्यालये / विद्यापीठ विभाग यांनी **https://bbabcacap24.mahacet.org/** या संकेतस्थळावर **दि. ०८.०७.२०२४ ते दि. १५.०७.२०२४** या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी करावी.

नावनोंदणी बाबतच्या सूचना :

१. महाविद्यालयाने Register College या टॅब वर क्लिक करुन महाविद्यालयाची माहिती भरावी. सदरहू माहिती भरल्यानंतर नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर महाविद्यालयाचा युजर आयडी उपलब्ध होईल. सदरहू युजर आयडी च्या आधारे अभ्यासक्रम नोंदणी करावी.
२. एका महाविद्यालयाने केवळ एकदाच महाविद्यालय नोंदणी करावी. सदरहू महाविद्यालयाच्या नोंदणी अर्जामध्ये बी.बी.ए., बी.सी.ए. आणि बी.एम.एस. या सारख्या एक किंवा त्यापेक्षा अधिक अभ्यासक्रमाची निवड करण्याबाबतचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

३. अभ्यासक्रम सेक्शन मध्ये Status यामध्ये निवड केलेल्या अभ्यासक्रमाचा अचूक Status निवडावा. (उदा. एखादे महाविद्यालय अनुदानित आहे, परंतू बी.बी.ए. अभ्यासक्रम कायम विना अनुदानित आहे. तर महाविद्यालयाने बी.बी.ए. अभ्यासक्रमाच्या Status मध्ये Un-aided हा विकल्प निवडावा.)

४. अर्जामध्ये अचूक माहिती भरुन, सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड करण्यात येणारी कागदपत्र वाचनीय असावीत.

५. अर्जातील सर्व माहिती बिनचूक भरलेली आहे, याची खातरजमा करावी. याच माहितीच्या आधारे संबंधित अभ्यासक्रमांना शासन मान्यता मिळणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.

६. माहिती भरुन आवश्यक कागदपत्र अपलोड केल्यानंतर, सदरहू माहितीची व अपलोड केलेल्या कागदपत्रांची पुनश्च: एकदा फेरपडताळणी करुन सर्व तपशील बरोबर असल्याची खातरजमा करावी, तद्नंतरच अर्ज सबमिट करावा.

७. महाविद्यालयाद्वारे अर्जात सादर केलेली माहिती व त्यासाठी अपलोड केलेली कागदपत्रे याची संचालनालय स्तरावर ऑनलाईन पध्दतीने तपासण्यात येणार असून सदरहू कागदपत्रामध्ये विसंगती / चूकीची कागदपत्रे आढळल्यास त्याबाबतची त्रूटी महाविद्यालयाला त्यांचे लॉगीनमध्ये दर्शविण्यात येईल. त्रूटी उपस्थित करण्यात आलेल्या कागदपत्रांची पूर्तता महाविद्यालयाने त्यांचे लॉगीनमधूनच करावी.

८. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता उपलब्ध करुन देण्यात आलेला कोड हा तात्पुरत्या स्वरुपातील असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयाला कायमस्वरुपी कोड उपलब्ध करुन देण्यात येईल.

९. अपूर्ण माहिती सादर केलेल्या महाविद्यालयांची नावे प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 08-07-2024 11:13:50

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति-

१. सर्व प्राचार्य, बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एम.एस. अभ्यासक्रम महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२/- सदरचे परिपत्रक हे आपल्या विद्यापीठाशी संलग्नित बी.बी.ए., बी.सी.ए,. बी.एम.एस. अभ्यासक्रमाच्या सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात यावे.
३. संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
४. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, फोर्ट, मुंबई - ०१.